SE.77 (A)

# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई यांचे कार्यालय

३०३, ओ विंग, ३ रा मजला, बी.एम.सी.गोडाऊन इमारत, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, टाकूर कॉम्प्लेक्स,
९० फुट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अे) अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/उपनि/ आर.द.वि./श्यामकुंजहौ/ ६३७ /२०१८.
दिनांक - २० / २ /२०१८.

वाचावे : १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतूद.
२) श्याम कुंज को.ऑप.हौसिंग सो.लि. ,व्हिलेज कांदीवली,कांदिवली(प) मुंबई ४०००६७ या संस्थेचे दि.०३.११.२०१७ रोजीचे पत्र.
३) श्याम कुंज को.ऑप.हौसिंग सो.लि. ,व्हिलेज कांदीवली,कांदिवली(प) मुंबई ४०००६७ या संस्थेचे दि.२९.१०.२०१७ रोजीचे पत्र.
४) या कार्यालयाचे जा.क्र.मुंबई/उपनि/आर.द.वि./श्यामकुंजहौ/१८३/२०१८ दि.१६.१.२०१८ रोजीची कलम ७७ (अ) अन्वये नोटीस

ज्याअर्थी, श्याम कुंज को.ऑप.हौसिंग सो.लि. ,व्हिलेज कांदीवली,कांदिवली(प) मुंबई ४०००६७ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यांत आलेली आहे तिचा नोंदणी क्रं. एमयूएम-डब्ल्यूआर-एचएसजी-टीसी-१४०५८ -२००७-२००८ दि.६.१२.२००७ असा आहे. आणि,

ज्याअर्थी, श्याम कुंज को.ऑप.हौसिंग सो.लि. ,व्हिलेज कांदीवली,कांदिवली(प) मुंबई ४०००६७ (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे), व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतूदीस अनुसरुन कामकाज करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्था बृहन्मुंबईच्या आर दक्षिण विभागात कार्यरत असल्याने त्या संस्थेचे निबंधक, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई हे आहेत आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे वाचावे क्र.२ च्या पत्रान्वये संस्थेने या कार्यालयात असे कळविले आहे की, संस्थेच्या व्यवस्थापक समितीचे पदाधिकारी चेअरमन-श्री. सुभाष डॉक्टर, सेक्रेटरी- श्री.जयेश शहा, ट्रेझरर- श्री.तरक ओझा तसेच संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य श्री.राकेश मेहता , श्री.वैभव देसाई, श्री.संदिप नराले, यांनी राजीनामे दिले आहेत. संस्थेचे पदाधिकारी चेअरमन-श्री. सुभाष डॉक्टर, सेक्रेटरी- श्री.जयेश शहा, ट्रेझरर- श्री.तरक ओझा यांनी दिलेले राजीनामे कमिटीने स्विकारले असल्याचे इतिवृत्त संस्थेने वाचावे क्रं. २ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविलेले आहे तरी पुढील कार्यवाही करण्याची विनंती संस्थेचे चेअरमन सेक्रेटरी यांनी वाचावे क्रं.१ च्या पत्रान्वये या कार्यालयास केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेमध्ये एकूण ८ सर्वसाधारण १ महिला राखीव सदस्यांची एकूण ९ सदस्यांची व्यवस्थापक समिती दि.९.८.२०१५ रोजी अस्तित्वात आली होती. त्यापैकी, संस्थेचे ३ पदाधिकारी व ३ व्यवस्थापक समिती सदस्यांनी राजीनामे दिले असून संस्थेमध्ये फक्त ३ व्यवस्थापक समिती सदस्य उरले आहेत.संस्थेचा एकूण सभासद संख्या १०१ असून त्यांच्या व्यवस्थापक समितीचा गणपूर्ती ७ असून संस्थेमध्ये फक्त ३ सदस्य उरले असल्यामुळे संस्थेचा गणपूर्ती पूर्ण होत नाही. सबब संस्थेच्या व्यवस्थापक समितमध्ये दोष निर्माण झालेला असून पोकळी निर्माण झालेली असून संस्थेचे कामकाज बंद पडलेले आहे. आणि,

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या रचनेमध्ये दोष निर्माण झाल्यास अथवा पोकळी निर्माण झाल्यास किंवा संस्थेचे कामकाज बंद पडले असल्यास अशा संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. आणि,

Scanned by CamScanner

त्याअर्थी, संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी/प्राधिकृत अधिकारी मंडळ का नियुक्त करण्यात येऊ नये? याबाबतचा लेखी खुलासा कार्यालयात सादर करणेसाठी व प्रत्यक्ष तोंडी म्हणणे मांडण्यासाठी वाचावे क्रं.४ च्या अन्वये नोटीस देण्यात येवून राजीनामे दिलेल्या पदाधिकारी यांना या कार्यालयात दि.१/०२/२०१८ रोजी दुपारी ठिक ३.०० वाजता योग्य त्या कागदपत्रांसह सुनावणीसाठी उपस्थित राहून लेखी व तोंडी खुलासा सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. सदर सुनावणीस राजीनामे दिलेले पदाधिकारी चेअरमन श्री.सुभाष डॉक्टर व सेक्रेटरी श्री.जयेश शहा, तसेच संस्थेचे व्यवस्थापक समिती सदस्य श्री.राकेश मेहता ,हे हजर होते.त्यांनी राजीनामा दिल्याचे मान्य केले. संस्थेचे ट्रेझरर- श्री.तरक ओझा श्री.देवांग देसाई, श्री.संदिप नराले हे सदर सुनावणीस हजर राहिले नाहीत. त्यांनी लेखी पत्र पाठवून आम्ही हजर राहू शकत नसल्याचे कळविले आहे. संस्थेचे व्यवस्थपाक समिती सदस्य श्री.पराग थडेश्वर,व श्री.महेंद्र त्रिवेदी हे हजर होते.

सबब संस्थेचे वरील राजीनामे दिलेले २ पदाधिकारी १ व्यवस्थापक समिती सदस्य यांनी राजीनामे दिल्याचे मान्य केले असून सुनावणीस हजर राहिले नसलेल्या पदाधिकारी व व्यवस्थापक समिती सदस्यांनी यांच्या पदांचे राजीनामे दिलेले असून त्यांचे याबाबत काहीही म्हणणे नाही असे माझे मत झाले असून संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्याबाबत माझी खात्री झाली असून मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी डॉ.अविनाश भागवत,उपनिबंधक, सहकारी संस्था आर-दक्षिण विभाग मुंबई ,श्याम कुंज को.ऑप.हौसिंग सो.लि. ,व्हिलेज कांदीवली,कांदिवली(प) मुंबई ४०००६७ या संस्थेवर संस्थेचे दैनदिन कामकाज पाहाण्यासाठी तसेच सुयोग्य व्यवस्थापनासाठी श्री.हनुमंत पवार,प्रमाणित लेखापरीक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे त्यांनी संस्थेच्या दैनंदिन कामकाज पाहून मुदतीत निवडणूक घेण्याची कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दि.२०/०२/.२०१८ रोजी माझे सही व शिक्यानिशी देत आहे.

OFFICE OF THE DEPUTY REGISTRAR C.S.R. WARD

(डॉ.अविनाश भागवत),
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

प्रति,
१..चेअरमन/सेक्रेटरी/ट्रेझरर, श्याम कुंज को.ऑप.हौसिंग सो.लि. ,व्हिलेज कांदीवली,कांदिवली(प) मुंबई ४०००६७
आपणांस कळविण्यांत येते की संस्थेच्या दप्तराचा ताबा नवनियुक्त प्राधिकृत अधिकारी यांचेकडे सूपूर्द करावा
२) प्राधिकृत अधिकारी श्री.हनुमंत पवार,प्रमाणित लेखापरीक्षक,श्याम कुंज को.ऑप.हौसिंग सो.लि. ,व्हिलेज कांदीवली,कांदिवली(प) मुंबई ४०००६७
२/- यांना कळविण्यांत येते की , त्यांनी संस्थेच्या पदाधिकारी यांचेकडून संस्थेच्या दप्तराचा ताबा घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
१) व्यवस्थापक- सारस्वत को.ऑप.बँक लि.शाख-कांदिवली(प)मुंबई६७
२) व्यवस्थापक-महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. शाखा-कांदिवली(प) मुंबई६७
**३) <u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u>**
१.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था मुंबई विभाग मुंबई
२.मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४) मुंबई

उपनिबंधक,
सहकारी संस्था,आर दक्षिण विभाग, मुंबई

Received
Parag Thadeshwar
20/02/2018.
22/2/18

Scanned by CamScanner